जनसंपर्क कक्ष

01 DEC 2022

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वप्नांची नजर द्यावी’

प्रतिनिधी

कोल्हापूर

‘ढासळती सामाजिक व राजकीय नैतिकता अमृतमहोत्सवी भारतासमोरील प्रमुख आव्हान आहे. शिक्षण, महागाई, धर्मवाद आणि जातीवाद इत्यादी समस्यांची सोडवणूक होण्यासाठी शैक्षणिक सुधारणा आवश्यक आहेत. त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वप्नांची नजर दिली पाहिजे. तसेच तृष्णा आणि गरज यातील भेद आपणास ओळखता आला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. सुचिता कोरगावकर यांची प्रमुख उपस्थित होती. या व्याख्यानमालेचे आयोजन प्रभाकरपंत कोरगावकर ट्रस्टने विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून केले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र कुंभार. सोबत डॉ. जगन कराडे, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, सुचिता कोरगावकर.

डॉ. कुंभार म्हणाले, शिक्षण व्यवस्थेसमोर अनेक समस्या आहेत. ज्ञान आणि मती यातील भेद ओळखून त्यात सुधारणा होणे आवश्यक आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना स्वप्नांची नजर देण्यात कमी पडत आहेत. शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. जगातील सर्व प्रश्न प्रेमाने सुटतात आणि बौद्ध विचार त्यासाठी मार्गदर्शक आहे. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, ‘विद्यार्थ्यांनी संयम आणि सातत्य यांच्या आधारे आपल्यातील क्षमता वृद्धिंगत केल्या पाहिजेत. आपल्या स्वप्नांचा पाठलाग करण्यासाठी कष्ट केले पाहिजे. ट्रस्टच्या संचालक सुचिता कोरगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन व पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. अभिजित पाटील, शरद पाटील, श्रीरंग बेलेवडे, श्रीधर साळोखे आदींनी संयोजन केले.

01 DEC 2022 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधानिक मूल्यांची जोपासना केल्यास लोकशाही सक्षम

## डॉ. प्रदीप जगताप : राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाला जोडलेल्या सरनाम्यावरून संविधानाचे सार लक्षात येते. संविधानात्मक मूल्य स्पष्ट करण्याचे काम सरनामा करतो. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्यांची जपणूक लोकशाहीसाठी महत्त्वाची आहे. या मूल्यांची जोपासना केल्यास लोकशाही सक्षम होईल, असे प्रतिपादन सोलापूर येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ. प्रदीप जगताप यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र यांच्यातर्फे राज्यशास्त्र विषयांतर्गत संविधान दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाईन व्याख्यानात 'भारतीय राज्यघटना आणि आजची लोकशाही' या विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

अध्यक्ष डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, संविधान प्रत्येकाच्या घरामध्ये धर्मग्रंथाप्रमाणे असावे व त्यातील तत्त्वांचे पालन प्रत्येक व्यक्तीने करावे. संविधानातील तत्त्वांचे पालन संपूर्ण समाजाच्या व देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे.

प्रास्ताविक डॉ. सचिन भोसले यांनी केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय समन्वयक डॉ. सी. ए. बंडगर यांनी करून दिला. आभार डॉ. नितीन रणदिवे यांनी मानले.

लोकमत

# टेनिस स्पर्धेस शिवाजी विद्यापीठाचा संघ पात्र

कोल्हापूर : मुंबई विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने एकूण पाच सामने जिंकून दिल्ली सोनीपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये स्थान मिळविले.

/ वृत्त ४ वर



शिवाजी विद्यापीठाच्या लॉन टेनिस संघाने मुंबईतील आंतर विद्यापीठ स्पर्धेत चमकदार कामगिरी करून अखिल भारतीय स्पर्धेत स्थान मिळविले.

# आंतर विद्यापीठ टेनिस स्पर्धेस शिवाजी विद्यापीठाचा संघ पात्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मुंबई विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय लॉन टेनिस स्पर्धेत ५४ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले. त्यात शिवाजी विद्यापीठ संघाने एकूण पाच सामने जिंकून दिल्ली सोनीपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये स्थान मिळविले.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाने तृतीय क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघाला २-१ या फरकाने हरवून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील स्थान निश्चित केले. या संघाकडून संदेश कुरळे, पार्थ पाटील ओमकार इस्लामपुरे, तेजस कुलये, सर्वजीत लांडगे यांनी चमकदार कामगिरी केली. त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रशिक्षक मनाल देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
01 DEC 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघ लॉन टेनिस स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ पश्चिम विभागीय स्पर्धा दि. २७ ते ३० नोव्हेंबरदरम्यान पश्चिम विभागीय लॉन टेनिस स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये एकूण ५४ विद्यापीठांनी सहभाग नोंदवला. यामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाने एकूण पाच सामने जिंकून दिल्ली सोनिपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये स्थान मिळविले.

या स्पर्धेत प्रथम एल. एन. आयसीपीई ग्वालियरसोबत सामना खेळला. त्यामध्ये २-१ या फरकाने विजय प्राप्त केला. दुसऱ्या सामन्यात एमजीएसयू बिकानेर सोबत २-१च्या फरकाने विजय मिळवला. तिसरा सामना केएसव्ही गांधीनगरसोबत २-० या फरकाने विजय मिळवला. चौथा सामना आयएमव्ही ग्वालियरसोबत अटीतटीच्या झालेल्या सामन्यात २-१ असा विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

उपांत्यपूर्व फेरीत एचएनजीयूयू पाटणसोबत २-० या फरकाने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघास २-१ या फरकाने पराभूत करून दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाने स्थान निश्चित केले. शिवाजी विद्यापीठ संघाकडून संदेश कुरले व पार्थ पाटील यांनी उल्लेखनीय कामगिरी करून विजय मिळवून देण्यासाठी मोलाचा वाटा उचलला. ओमकार इस्लामपुरे, तेजस कुलये, सर्वजित लांडगे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन लाभले. संघ व्यवस्थापक प्रा. मुजफ्फर लगीवाले व कोच मनाल देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# लॉन टेनिसमध्ये विद्यापीठ संघाचे यश

कोल्हापूर, ता. ३० : मुंबई विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या लॉन टेनिस संघाने पाच सामने जिंकले. दिल्ली सोनीपत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली. शिवाजी विद्यापीठ संघाकडून संदेश कुरले व पार्थ पाटील यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. ओमकार इस्लामपुरे, तेजस कुलये, सर्वजीत लांडगे यांनीही चमकदार कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रशिक्षक मनाल देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.